पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १५५। किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार २८/०६/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

## नागरीक हो दुध म्हणून अमृत पिता की विष ?

# भेसळयुक्त दूध, खवा, तूप, पनीर, आईस्क्रीम मिठाई ठरत आहेत आरोग्यासाठी घातक



युवावार्ता (प्रतिनिधी)

दुग्धजन्य पदार्थांमधील वाढती भेसळ, निकृष्ट दर्जाचे उत्पादन आणि बेकायदेशीर विक्रीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून हा विषय राज्यभरात चिंतेचा ठरला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी भेसळविरोधी कारवाईची मोहीम हाती घेतल्यानंतर हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असला, तरी आजही खवा, पनीर, मिठाई, आईस्क्रीम, तूप, फ्लेवर्ड मिल्क तसेच इतर दुग्धजन्य पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे.

विशेष म्हणजे अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला स्टॉल उभारून कोणत्याही परवान्याशिवाय आणि गुणवत्ता तपासणीशिवाय खुले दूध विकले जात आहे. हे दूध कोणत्या जनावराचे आहे, त्यात पाणी किंवा रासायनिक पदार्थांची भेसळ आहे का, त्याची स्वच्छता व दर्जा काय आहे, याची कोणतीही खात्री नसते. तरीही स्वस्त दराच्या मोहापायी अनेक नागरिक हे दूध खरेदी करत असल्याचे दिसून येते.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, भेसळयुक्त दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये डिटर्जंट, स्टार्च, कृत्रिम फॅट, युरिया, सिंथेटिक दूध, कृत्रिम रंग, निकृष्ट तेल तसेच इतर घातक रसायनांचा वापर केला जातो. अशा पदार्थांचे सातत्याने सेवन केल्यास पोटाचे विकार, अन्न विषबाधा, यकृत व मूत्रपिंडाचे आजार, त्वचारोग, पचनसंस्थेचे विकार, लहान मुलांमध्ये वाढ खुंटणे तसेच कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढू शकतो. सणासुदीच्या काळात खवा, मिठाई आणि पनीरची मागणी वाढत असल्याने काही विक्रेते नफेखोरीच्या हव्यासापोटी भेसळयुक्त पदार्थांची विक्री करतात. (पान २ वर)

**अनेक ठिकाणी दुधातील स्निग्धांश काढून (फॅट फ्री) वनस्पती तुपाची बर्फी बनवली जाते. अशी बर्फी आरोग्यास हानिकारक असते. सर्वसामान्य नागरिकांना बर्फी मधील भेसळ सहजासहजी ओळखता येत नाही. त्यामुळे दुकानदारांचे फावते. दरम्यान बर्फी मधील ही भेसळ ओळखण्यासाठी थोडी बर्फी किंवा खवा घेऊन त्यात टिंचर आयोडीनचे दोन थेंब टाका. जर त्याचा रंग निळा झाला, तर त्यात स्टार्चची भेसळ आहे, असे समजावे. बर्फी हातावर चोळल्यास जर ती दाणेदार न लागता खूपच गुळगुळीत आणि मेणासारखी वाटत असेल तर त्यात वनस्पती तूप किंवा पामतेलाची भेसळ असते. नियमानुसार दुकानात ट्रेमध्ये ठेवलेल्या सुट्या मिठाईवर कधीपर्यंत खावी याची पाटी असायला हवी अशी मागणी ग्राहकांनी करणे गरजेचे आहे.**

# सिन्नर- संगमनेरला डावलले

## जनतेचा संताप, गोंदे फाटा येथे रस्ता रोकोचा इशारा




युवावार्ता (प्रतिनिधी)

सिन्नर- नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वेसाठी सिन्नर-संगमनेर-आळेफाटा-नारायणगाव-मंचर-खेड-चाकण हा सरळ आणि लोकहिताचा प्रस्तावित मार्ग बदलण्याच्या हालचालींमुळे उत्तर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. हजारो नागरिकांच्या विकासाचा मार्ग रोखणारा हा निर्णय कोणत्याही परिस्थितीत मान्य केला जाणार नाही, असा आक्रमक इशारा सिन्नर तालुका रेल्वे कृती समितीने दिला आहे.

सिन्नर तहसील कार्यालय आणि नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत समितीने प्रशासनासमोर स्पष्ट भूमिका मांडत, सरळ मार्गावर कोणतीही तडजोड नाही असा ठाम पवित्रा घेतला. प्रशासनाने आंदोलन मागे घेण्याची विनंती केली असली तरी समितीने ती फेटाळून लावत मूळ मार्ग कायम ठेवण्याची मागणी पुन्हा अधोरेखित केली. समितीच्या मते, सिन्नर-संगमनेर मार्ग वगळल्यास उत्तर महाराष्ट्र, अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील लाखो नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्राचे मोठे नुकसान होईल. हा मार्ग औद्योगिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असून तो बदलणे म्हणजे संपूर्ण प्रगतीला खीळ घालण्यासारखे आहे.

दरम्यान, २९ जून रोजी गोंदे फाटा येथे प्रस्तावित रस्ता रोको आंदोलनाबाबतचा अंतिम निर्णय मुख्यमंत्र्यांशी चर्चेनंतर जाहीर करण्यात येणार आहे. मात्र मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा निर्धार कृती समितीने व्यक्त केला आहे.

खा. डॉ. अमोल कोल्हे यांनी हा विषय संसदेत मांडण्याचे, तर आ. सत्यजित तांबे यांनी संबंधित आमदारांना एकत्र करून विधानसभेत आवाज उठवण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आता शासन सिन्नर-संगमनेरच्या जनभावनेचा सन्मान करणार की मार्ग बदलण्याचा निर्णय कायम ठेवणार, याकडे संपूर्ण उत्तर महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## महाराष्ट्रात पुन्हा पेपरफुटीचा धक्का! 'टीईटी' परीक्षा ऐनवेळी स्थगित

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील स्पर्धा व पात्रता परीक्षांच्या विश्वासार्हतेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उद्या (रविवार) होणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटीच्या संशयामुळे ऐनवेळी स्थगित करण्यात आली आहे. ठाणे परिसरातून प्रश्नपत्रिका जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर शिक्षण विभागाने तातडीने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे लाखो परीक्षार्थ्यांच्या मेहनतीवर पुन्हा एकदा पाणी फिरले असून विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, परीक्षेपूर्वीच काही दलाल पैसे घेऊन विद्यार्थ्यांपर्यंत प्रश्नपत्रिका पोहोचवत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचत संशयितांकडून प्रश्नपत्रिका जप्त केल्या. या घटनेची माहिती तत्काळ शिक्षण विभागाला देण्यात आली आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकरणी काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. प्रश्नपत्रिका नेमकी कुठून बाहेर पडली, त्यामागे कोणते रॅकेट कार्यरत आहे, कोचिंग क्लासेस किंवा शिक्षण विभागातील कोणाचा सहभाग आहे का, याचा सर्वंकष तपास पोलीस करत आहेत. मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचण्यासाठी तपास यंत्रणांनी चौकशीची व्याप्ती वाढवली आहे.

# आई - बाबा आणि साईबाबांची शप्पथ घेऊन गद्दारी केली

## फुटलेल्या खासदारांवर ठाकरेंचा प्रहार



मुंबई (वृत्तसंस्था)

जी लोकं कालपर्यंत माझ्यासोबत होती आणि आज ती फुटली, या लोकांची मला लाज वाटते. माझ्या नावावर आणि माझ्या दौऱ्यांमुळेच हे खासदार निवडून आले होते. या गद्दारांनी चक्क आईची आणि साईंची शपथ घेऊन गद्दारी केली आणि गद्दारांच्या कळपात जाऊन सामील झाले. म्हणूनच, या मतदारसंघात येऊन मी माझ्या मतदारांची जाहीर माफी मागण्यासाठी आलो आहे, अशा भावनिक शब्दांत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बंडखोरांचे वाभाडे काढले. यवतमाळच्या महासभेत बोलताना त्यांनी बंडखोर खासदार संजय देशमुख यांचा एक जुना व्हिडिओही दाखवला.

केंद्रीय यंत्रणा आणि सत्ताधाऱ्यांवर हल्ला चढवताना उद्धव ठाकरे म्हणाले, यांनी आमचा पक्ष चोरला, चिन्ह चोरले, आमदार-खासदार फोडले तरीही ठाकरे आज ताठ कण्याने मैदानात उभा आहे. आमदार फोडल्यानंतरही शिवसैनिकांनी मेहनत करून या खासदारांना पुन्हा निवडून दिले होते, पण हे विकले गेले. सध्या राज्यात निवडणुका नसतानाही ही फोडाफोडी सुरू आहे. पण मी सांगतो, जोपर्यंत जनतेचे प्रश्न संपत नाहीत, तोपर्यंत कोणीही ठाकरे किंवा शिवसेना संपवू शकणार नाही. जेव्हा कधी निवडणुका होतील, तेव्हा याच मतदारसंघातून पुन्हा ठाकरेंचाच खासदार निवडून येईल.

भाजपवर थेट निशाणा साधत उद्धव ठाकरे म्हणाले, आज देशात राम मंदिराच्या दानपेटीतील पैसे चोरले जात आहेत. हे सरकार केवळ लूट करत आहे. हे खासदार म्हणतात की विकासनिधीसाठी आम्ही गेलो; पण मला सांगा, हा विकासनिधी काय फक्त भाजपच्या मालकीचा आहे का? तो जनतेच्या हक्काचा पैसा आहे. ६ खासदारांच्या बंडानंतर विदर्भातील पहिल्याच सभेत उद्धव ठाकरे यांनी बंडखोरांना थेट गाडण्याचा इशारा दिला असून, या सभेला शिवसैनिकांनी अलोट गर्दी केली होती.

**हिंमत असेल तर राजीनामा द्या आणि पुन्हा लढून दाखवा- संजय राऊत**

उद्धव ठाकरे यांच्या यवतमाळ येथील जाहीर सभेत खासदार संजय राऊत यांनी बंडखोर खासदारांसह भाजपवर जोरदार टीका केली. माझ्यासारखे लाखो निष्ठावंत शिवसैनिक आहेत, म्हणूनच शिवसेना आजही संकटात खंबीरपणे उभी आहे, असे सांगत त्यांनी पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचे कौतुक केले. यावेळी राऊत म्हणाले, येथील बाजार समितीत शेतमालाला योग्य भाव मिळत नाही, पण इथल्या खासदाराला ५० कोटींचा भाव मिळाला. मात्र, येणाऱ्या निवडणुकीत त्याची ५ रुपयांचीही किंमत राहणार नाही. तसेच, गद्दारी करायची असेल तर आधी खासदारकीचा राजीनामा द्या आणि पुन्हा जनतेसमोर जाऊन निवडणूक लढवा, असे आव्हानही त्यांनी दिले.










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# जमीनधारणेचा निकष नसल्याने शेतकऱ्यांना मिळणार समान लाभ - आ. अमोल खताळ




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी महायुती सरकारने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर केली असून, या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे या योजनेसाठी जमीनधारणेचा कोणताही निकष ठेवण्यात आलेला नसल्याने लहान, मध्यम तसेच मोठ्या शेतकऱ्यांना समान लाभ मिळणार असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात दिली.

राज्य सरकारने शेतकरी हिताला केंद्रस्थानी ठेवून पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी विविध कर्जमाफी योजनांमधून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी शासनाने प्रोत्साहनपर लाभाची तरतूद केली आहे. कर्जाची वेळेवर परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रामाणिक पणाचा सन्मान राखत त्यांना आर्थिक प्रोत्साहन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे शिस्तबद्ध कर्ज फेडीला चालना मिळण्यास मदत होणार आहे.

राज्याच्या अर्थसंकल्पातही शेतकरी कल्याणासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. शेती विकास, सिंचन, कृषी पायाभूत सुविधा आणि शेतकरी सक्षमीकरणासाठी विविध योजनांना निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. कृषी क्षेत्राला प्राधान्य देण्याची सरकारची भूमिका यामधून स्पष्ट होत आहे. कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी प्रोत्साहनपर लाभ आणि कृषी क्षेत्रा साठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळण्यास मदत होणार आहे. महायुती सरकारचा हा निर्णय शेतकरी हिताचा विचार करून घेण्यात आला असून, राज्यातील कृषी क्षेत्राला अधिक बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

# पद्मशाली समाजाच्यावतीने गुणवंत विद्यार्थी व लाडक्या सुनांचा गौरव सोहळा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील पद्मशाली समाजाचा आदर्श इतर समाजांनी घ्यावा. संगमनेरसारख्या ठिकाणी इतक्या मोठ्या प्रमाणावर गुणवंत विद्यार्थी आणि समाजाच्या लाडक्या सुनांचा गौरव होत असल्यामुळे राज्यभर संगमनेरच्या पद्मशाली समाजाचे नाव आदराने घेतले जाते, असे प्रतिपादन राज्य ओबीसी महासंघाचे निमंत्रक मा. अशोकजी इंदापूरे यांनी केले.

रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी मालपाणी लॉन्स येथे पद्मशाली समाज मंडळाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सत्कार, समाजाच्या लाडक्या सुनांचा सन्मान तसेच शालेय साहित्य वाटप समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी मुंबई येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक मा. वरलक्ष्मीजी सकिनाल यांनी विद्यार्थी व समाजाच्या लाडक्या सुनांचे तोंडभरून कौतुक केले. संगमनेरमधील पद्मशाली समाजाच्या एकोप्याची ताकद या कार्यक्रमातून दिसून येत असल्याचे सांगत त्यांनी समाजाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच समाजामध्ये शिक्षणाला दिले जाणारे प्राधान्य आणि गुणवंतांचा सन्मान करण्याची परंपरा निश्चितच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी मा. अशोकजी इंदापूरे व मा. वरलक्ष्मीजी सकिनाल यांचा 'समाजभूषण' पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला.

समाजाचे अध्यक्ष गणेश मादास यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात कोणताही सामाजिक उपक्रम हा समाजबांधवांचे सहकार्य, प्रायोजकांचे पाठबळ आणि सर्वांच्या एकजुटीशिवाय यशस्वी होऊ शकत नाही, असे सांगून समाजातील सर्व दाते, कार्यकर्ते आणि उपस्थितांचे आभार मानले. शिक्षक नेते हिरालाल पगडाल यांनी समाज मंडळाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'संगमनेरच्या लाडक्या सुना' या अभिनव उपक्रमाचे विशेष कौतुक केले. समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व सुनांचा सन्मान करून नव्या पिढीला प्रेरणा देण्याचे कार्य पद्मशाली समाज सातत्याने करत असल्याचे त्यांनी सांगितले.


यावेळी उपाध्यक्ष शांताराम आडेप, संजय पगडाल, पापय्या शिरसुल्ला, चंद्रशेखर झुंजूर, चंद्रकांत एनगंदुल, अरविंद पगडाल, मधुकर वनम, विरेश आडेप, दत्तात्रय इटप, सुनील मादास, नारायण इटप, महिला अध्यक्षा सौ. लक्ष्मी इटप, नगरसेविका सौ. सरोजना पगडाल, युवक अध्यक्ष एकनाथ श्रीपत आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात इयत्ता पहिली ते बारावी, तसेच पदवी व पदव्युत्तर शिक्षणात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. याशिवाय विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजाच्या लाडक्या सुनांचाही सन्मान करण्यात आला. गुणवंत विद्यार्थी व सुनांना स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्र आणि शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमास नरेंद्र आडेप, शंकर गुंडेट्टी, रमेश वनम, अनिल अन्नलदास, राम शिरसुल्ला, अनिल दुस्सा, दत्तात्रय पगडाल, प्रकाश वनम, विनोद झुंजूर, अंबादास आडेप, विशाल एनगंदूल, रविंद्र उडता, व्यंकटेश अमृतवाड, पवन पासकंटी, सौ. कविता शिरसुल्ला, सौ. ज्योती दुस्सा यांच्यासह समाजातील मोठ्या संख्येने बंधू-भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रकल्प प्रमुख सौ. ज्योती दुस्सा व सौ. साईसुधा वनम यांनी उत्कृष्ट नियोजन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पद्मशाली समाज मंडळ, महिला मंडळ आणि युवक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

समाजातील गुणवंतांचा सन्मान करून शिक्षणाला प्रोत्साहन देणे, तसेच समाजातील सुनांच्या कर्तृत्वाचा गौरव करणे हा उपक्रम केवळ सन्मानाचा नसून सामाजिक एकात्मता आणि संस्कार जपणारा उपक्रम असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

Happy Birthday


मा.श्री. हिरालाल पगडाल
माजी नगरसेवक,
कामगार संघटनेचे अध्यक्ष


मा. श्री. मेहश भोर
अमेरिका आयटी इंजिनियर


मा. श्री. कैलास ढोले
हॉटेल ग्रेप्सचे संचालक

शुभेच्छुक -
दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

# मतदार यादीतून कोट्यवधी नावे वगळली

युवावार्ता (प्रतिनिधी)

मतदारयाद्यांच्या विशेष पुनरावलोकन मोहिमेला (एसआयआर) प्रारंभ होऊन एक वर्ष पूर्ण झाले. या कालावधीत निवडणूक आयोगाने सदर उपक्रमाद्वारे देशभरात सुमारे सहा कोटी नावे मतदार यादीतून वगळली आहेत. या प्रक्रियेमुळे विरोधक आणि निवडणूक आयोग यांच्यात तीव्र वाद निर्माण झाला असला, तरी आयोगाने मतदारयादीतील त्रुटी दूर करण्याची मोहीम १९ राज्ये, केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू ठेवली आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी प्रायोगिक तत्त्वावर ही मोहीम सुरू झाली होती. त्यानंतर ६५ लाख नावे वगळण्यात आली. कागदपत्रांच्या नावाखाली नागरिकांना मतदानापासून वंचित ठेवल्याचा आरोप विरोधकांनी केला. मात्र, एसआयआरची घटनात्मक वैधता सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवली.नववीच्या पुस्तकात समावेशएसआयआरवरील मजकुराचा समावेश एनसीईआरटीच्या नववीच्या समाजशास्त्र पुस्तकात केला आहे. पात्र मतदार वगळला जाणार नाही. अपात्र व्यक्तीचा समावेश होणार नाही, यासाठी ही प्रक्रिया असल्याचे नमूद आहे. `६६.८८ लाख मृत मतदारांची नावे हटविण्यात आली६३.१६ लाख नावे पडताळणीनंतर वगळली१०.२ टक्क्यांनी मतदार घटले. १२ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये ५०.९९ कोटी मतदारांपैकी ५.१८ कोटी नावे वगळली गेली. पहिला टप्पा : जून ते सप्टेंबर २०२५ - बिहारमधील सुमारे ४७ लाख दुबार किंवा मृत मतदारांची नावे वगळली.

# आरोपींना गुन्ह्याची प्रत न देणे पडले महागात

## रक्कम स्वतःच्या पगारातून जमा करण्याचे कोर्टाचे निर्देश

### फौजदारास झाला पंचवीस हजार रूपये दंड

कायद्यानुसार बंधनकारक असूनही आरोपींना तक्रार किंवा गुन्ह्याची प्रत न दिल्याने मुंबई उच्च न्यायालयाने पोलिसांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, या प्रकरणी पालघर जिल्ह्यातील एका पोलिस अधिकाऱ्याला २५,००० रुपयांचा दंड ठोठावला आहे.

प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने गुरुवारी दिलेल्या आपल्या आदेशात म्हटले आहे की, कायद्यानुसार आरोपींना तक्रारीच्या प्रती देणे आवश्यक आहे. पालघर जिल्ह्यातील वाडा पोलिस ठाण्यात आर्थिक गुन्ह्याबाबत दाखल असलेल्या गुन्ह्यामधील काही आरोपींनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालय सुनावणी करत होते. आरोपींच्या म्हणण्यानुसार, ते पोलिसांसमोर हजर झाले आणि त्यांनी गुन्ह्याच्या प्रती मागितल्या, परंतु

वाडा पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याने त्यांना या प्रती दिल्या नाहीत.

ज्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत अशा व्यक्तींना पोलिसांकडून तक्रार किंवा गुन्ह्याची प्रत देण्यास नकार दिला जात असल्याने त्यांना नाइलाजाने न्यायालयात धाव घ्यावी लागते, अशा अनेक याचिका आमच्या निदर्शनास आल्याचे खंडपीठाने आदेशात नमूद केले.

खंडपीठाने वाडा पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला २५,००० रुपयांचा दंड ठोठावला असून, ही रक्कम दोन आठवड्यांच्या आत त्यांच्या स्वतःच्या पगारातून न्यायालयात जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. याशिवाय, याचिकाकर्त्यांना येत्या पाच दिवसांत एफआयआरच्या प्रती देण्याचे आदेशही न्यायालयाने पोलिसांना दिले.

# पुणे विभागातील २२ शेतकऱ्यांना विविध कृषी पुरस्कार जाहीर

पुणे- (वृत्तसंस्था)

पुणे विभागातील पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यातील कृषी फलोत्पादन आणि संलग्न क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २२ शेतकऱ्यांना विविध कृषी पुरस्कार जाहीर झाले असून १ जुलै रोजी कृषी दिनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार असल्याची माहिती विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी कळविली आहे.

कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरीता योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांचा आणि कृषि विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणा-या व्यक्ती, संस्था, गट, अधिकारी, कर्मचारी यांना महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), उद्यान पंडीत, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, पीकस्पर्धा विजेते, पद्मश्री. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येते.

विविध कृषी पुरस्कार सन २०२३ व सन २०२४ साठी महाराष्ट्र राज्यातून अनुक्रमे ९१ व ९८ शेतकरी, कर्मचारी यांना शेतकरी व कृषि विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत पुरस्कार जाहीर झाले. एकूण पुरस्कारप्राप्त शेतक-यांपैकी पुणे विभागातील अहिल्यानगर, पुणे व सोलापूर येथील २२ शेतकरी, कर्मचारी यांची निवड झाली आहे. अहिल्यानगर ५, पुणे ८ व सोलापूर जिल्ह्यातील ९ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे. पुरस्कार वितरण सोहळा डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी, मुंबई-१८ येथे आयोजीत करण्यात आला आहे.

सन २०२३ मधील पुरस्कार विजेते -शिवानंद मल्लेशी शिंगडगाव ( मंद्रूप, सोलापूर) श्रद्धा सत्यवान ढवन (मोरवाडी अहिल्यानगर) कांतीलाल किसन नलगे (नागरगाव पुणे) प्रवीण दिलीप माने (बैरागवाडी सोलापूर) राहूल भारत बनकर (करकंब सोलापूर) सदाशिव मनोहर चौघुले (जुजारपूर सोलापूर) गणपतराव बाळासाहेब शिंदे (रहिमतपूर अहिल्यानगर) यतीन बापूराव घुले (काटेवाडी पुणे) प्रणव राजकुमार बिराजदार ( निंबर्गी सोलापूर) आदिवासी एकता शेतकरी गट (गुंजाळवाडी अहिल्यानगर) नविनचंद्र हरिश्चंद्र बोराडे,उप कृषी अधिकारी (मावळ पुणे)

सन २०२४ मधील पुरस्कार विजेते : समीर मोहनराव डोंबे (खोर पुणे) छाया तानाजी पवार (कुरणेवाडी पुणे) खुशालचंद्र बाबासाहेब मोरे (बारलोणी सोलापूर) योगेश नामदेव धनगर (तांदुळवाडी पुणे) सुरज सुखदेव अवताडे ( एखतपूर सोलापूर ) अमर अशोकराव भोसले (सराटी पुणे) गोवर्धन प्रल्हाद खेडकर (भालगाव अहिल्यानगर) संतोष भिकाजी धुमाळ (पेठ पुणे ) गंगाधर प्रफुल्लचंद्र बिराजदार (निंबर्गी सोलापूर) शंकर जगन्नाथ केंगले (डोण पुणे) सुखदेव ज्ञानदेव जमधडे (शेवगाव अहिल्यानगर)

# नफेखोरीपायी...

पान १ वरून -

यामुळे ग्राहकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याची भावना व्यक्त होत आहे. नागरिकांनी दूध व दुग्धजन्य पदार्थ केवळ विश्वासार्ह आणि परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावेत, अत्यंत स्वस्त दरात मिळणाऱ्या पदार्थांबाबत सावधगिरी बाळगावी, उत्पादनावरील उत्पादन व मुदत समाप्तीची तारीख तपासावी तसेच संशयास्पद पदार्थ आढळल्यास अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार करावी, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाने भेसळ करणाऱ्यांविरुद्ध अधिक कठोर कारवाई करावी, नियमित तपासणी मोहीम राबवावी, रस्त्यावरील खुले दूध विक्रीवर नियंत्रण आणावे आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करून मोठा दंड व परवाने रद्द करण्याची तरतूद प्रभावीपणे अंमलात आणावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

नफेखोरीसाठी अन्नात भेसळ करणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळण्यासारखे आहे. त्यामुळे भेसळखोरांविरुद्ध कठोर कायदे आणि सातत्यपूर्ण कारवाई ही काळाची गरज बनली आहे, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आह

# राज्यात हजारो कोटींचा मुद्रांक घोटाळा, देशाचे महालेखापरिक्षक करणार चौकशी

मुंबई (वृत्तसंस्था)

अनधिकृत इमारतींची बेकायदा नोंदणी करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविण्यात आल्याचे धक्कादायक प्रकरण उघडकीस आले आहे. नवी मुंबईतील शेकडो इमारतींची बोगस नोंदणी करून सरकारचा १३ कोटी ९१ लाख रुपयांचा महसूल बुडविणाऱ्या ठाणे दुय्यम निबंधक कार्यालयातील वरिष्ठ लिपिक आर.बी. दहिफळे यांच्यावर कठोर कारवाई करण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली.

राज्यात अनाधिकृत बांधकामांची नोंदणी करताना काही ठराविक विकासकांना हाताशी धरून मुद्रांक निश्चिती करताना मोठ्या प्रमाणात फेरफार केला जात असून यातून सरकारचे दहा ते वीस हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. या प्रकरणाची व्याप्ती पाहता देशाचे महालेखापरिक्षक यांच्या माध्यमातून विशेष चौकशी पथके स्थापन करून संपूर्ण राज्यात १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२६ दरम्यान झालेल्या सर्व दस्त नोंदणीची शहानिशा करण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

विधानसभेत नवी मुंबईत अनाधिकृत इमारतीधील दस्ताची बेकायदा नोंदणी करून राज्य सरकारचा कोट्यावधी रुपयांचा महसूल घडविल्याबद्दल जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावरील चर्चेदरम्यान बावनकुळे यांनी ही महत्त्वपूर्ण घोषणा केली. नवी मुंबईतील ८०० दस्तांची केवळ १० दिवसात बेकायदा नोंदणी करून सरकारचा १३ कोटी ९१ लाख रुपयांचे मुद्रांक शुल्क बुडविल्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुद्रांक अधिकारी दहिफळे यांनी विकासकांशी संगनमत करून हा घोटाळा केला असून प्रकरणात दहिफळे यांना निलंबित करण्यात आले आहे .तसेच त्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून लवकर त्यांच्यावर सेवेतून बडतर्फीची कारवाई केली जाईल अशी माहितीही बावनकुळे यांनी यावेळी दिली.

केवळ नवी मुंबईतच नव्हे तर संपूर्ण राज्यात अशाच प्रकारे मुद्रांक अधिकाऱ्यांनी त्यांना मिळालेल्या अर्ध न्यायिक अधिकारांचा गैरवापर करून अनेक विकासकांशी संगनमत करून शासनाचा हजारो कोटी रुपयांचा महसूल बुडविला आहे. तसेच अनाधिकृत दस्तऐवज, अनाधिकृत इमारतीची मोठ्या प्रमाणात नोंदणी केली आहे. राज्य सरकारने संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून १ एप्रिल २०२१ पासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राज्यातील जेवढे मुद्रांक दस्त नोंदणी झाले आहेत त्याची तपासणी केली जाणार आहे.

ही तपासणी भारताचे महालेखापरीक्षक यांच्या मार्फत केली जाणार असून त्यांनी विशेष तपासणी पथके स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. या चौकशीनंतर जे जे अधिकारी दोषी आढळतील त्यांच्यावर निलंबनाची आणि फौजदारी कारवाई केली जाईल.

# एमपीएससी भरतीत मोठे बदल

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने भरती प्रक्रियेत मोठा बदल करून आगामी सर्व पूर्व परीक्षा संगणकाधारित (सीबीटी) पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्य परीक्षा मात्र पूर्वीप्रमाणे लेखी स्वरूपातच होणार आहे. आयोगाने शुक्रवारी गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ अंतर्गत २,६१९ पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली असून ही माहिती शुक्रवारी आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमनवार यांनी सीबीडी बेलापूर येथे पत्रकार परिषदेत दिली

.राज्य शासनाच्या ५ मेच्या निर्णयानुसार भरतीप्रक्रियेत व्यापक सुधारणा करण्यात आल्या आहेत. पुढील काळात आयोगामार्फत भरल्या जाणाऱ्या पदांची संख्या चार ते पाच पट वाढण्याची शक्यता असल्याने पारंपरिक ऑफलाइन परीक्षा वेळेत घेणे कठीण होणार आहे. परीक्षा केंद्रांची उपलब्धता, प्रश्नपत्रिका छपाई, वाहतूक, सुरक्षा आणि मनुष्यबळ या अडचणींवर मात करण्यासाठी सीबीटी पद्धतीचा अवलंब केला असल्याचे ते म्हणाले. या महत्त्वपूर्ण बदलांमुळे भरती प्रक्रिया कालबद्ध पूर्ण करणे शक्य होईल, असा विश्वासही भिमनवार यांनी व्यक्त केला.परीक्षा अधिक जलद, पारदर्शक व सुरक्षितभिमनवार यांनी सांगितले की, सीबीटीमुळे परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित व जलद होईल. उत्तरपत्रिकांचे संगणकीय मूल्यमापन, प्रश्नपत्रिकेची गोपनीयता व डिजिटल सुरक्षा यामुळे निकाल जलद लागतील आयोगाचे उद्दिष्ट प्रत्येक संवर्गाची भरती प्रक्रिया त्याच वर्षात पूर्ण करण्याचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर आणि सहसचिव सरिता बांदेकर-देशमुख उपस्थित होते.परीक्षा अधिक जलद, पारदर्शक व सुरक्षितभिमनवार यांनी सांगितले की, सीबीटीमुळे परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित व जलद होईल. उत्तरपत्रिकांचे संगणकीय मूल्यमापन, प्रश्नपत्रिकेची गोपनीयता व डिजिटल सुरक्षा यामुळे निकाल जलद लागतील आयोगाचे उद्दिष्ट प्रत्येक संवर्गाची भरती प्रक्रिया त्याच वर्षात पूर्ण करण्याचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# तालुक्यातील ११ गावांमध्ये वनसंवर्धन व हवामान बदल जनजागृती अभियान यशस्वी



भारतीय वनीकरण संशोधन व शिक्षण परिषदेच्या जीआयझेड 'रीकॅप४एनडीसी' प्रकल्पांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील ११ ग्रामपंचायतींमध्ये वनसंवर्धन, जैवविविधता संरक्षण आणि हवामान बदल या विषयांवरील जनजागृती व प्रशिक्षण अभियान नुकतेच यशस्वीरित्या पार पडले. १२ ते २५ जून २०२६ या कालावधीत हा व्यापक उपक्रम राबविण्यात आला.

अन्नपूर्णा सेवाभावी संस्थेने भारतीय वानिकी संशोधन आणि शिक्षण परिषद (डेहराडून) यांच्या सहकार्याने आणि महाराष्ट्र वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली या महत्त्वपूर्ण प्रकल्पाची अंमलबजावणी केली.हे अभियान डॉ. आर. एस. रावत आणि डॉ. शिल्पा गौतम यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. यामध्ये आय. सी. एफ.आर.ई. कडून एन. पी. एस. नयन सर, अन्नपूर्णा सेवाभावी संस्थेकडून प्रमोद सावंत, जिल्हा समन्वयक रमेश, मार्गदर्शक (ट्रेनर्स) देशमुख सर, देशपांडे मॅडम, शरद नेहे सर, अनुराधा मॅडम आणि वन विभागाचे ग्राम पातळीवरील अधिकारी व वनरक्षक उपस्थित होते. या अभियानामध्ये ग्रामपंचायत पदाधिकारी, वन व्यवस्थापन समितीचे सदस्य, महिला बचत गट, युवक, शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ तसेच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी मोठा सहभाग नोंदविला. या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत वनांचे संवर्धन, वनक्षेत्राची पुनर्स्थापना, जैवविविधतेचे रक्षण, हवामान बदलाचे वाढते परिणाम, नैसर्गिक साधनसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन आणि या प्रक्रियेतील लोकसहभागाचे महत्त्व यावर तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या दोन आठवड्यांच्या कालावधीत निवडक ११ ग्रामपंचायतींमध्ये (कऱ्हे, सायिखिंडी, कोकणगाव, शिवापूर, कोंची, मांची, करुले, निळवंडे, पोखरी हवेली, मालदाड, सोनोशी) येथे जनजागृती सभा, प्रशिक्षण सत्रे, शालेय विद्यार्थ्यांसाठी संवेदनशीलता उपक्रम आणि पर्यावरण विषयक संवाद घडवून आणण्यात आला. याशिवाय आकर्षक भित्तीचित्रांच्या माध्यमातूनही गावागावांत प्रभावी जनजागृती करण्यात आली.

# तुषार आहेर यांची नगरविकास विभागाच्या उपायुक्तपदी पदोन्नती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पठार भागातील घारगाव येथील माजी सरपंच तथा प्रगतशील शेतकरी संजय शिवाजी आहेर यांचे चिरंजीव तुषार संजय आहेर यांची येवला महानगरपालिकेच्या नगरविकास विभागाच्या उपायुक्तपदी पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल घारगावसह परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

तुषार आहेर यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण घारगाव येथे झाले. त्यानंतर त्यांनी बी.ई. सिव्हिलचे शिक्षण पूर्ण केले. २०१३ मध्ये त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली आणि २०१७ मध्ये त्यांना यश मिळाले. त्यानंतर त्यांची २०२० मध्ये मालेगाव येथे असिस्टंट कमिशनर म्हणून नियुक्ती झाली. पुढे २०२२ ते २०२४ या कालावधीत त्यांनी राहाता नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पदाचा कार्यभार यशस्वीपणे सांभाळला. यानंतर त्यांनी नाशिक महानगरपालिकेत असिस्टंट कमिशनर म्हणून काम पाहिले. पुढे येवला नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर त्यांच्या कामाची दखल घेत त्यांची मुख्याधिकारी, येवला नगरपालिका येथे पदस्थापना देऊन पदोन्नती करण्यात आली. तुषार आहेर यांच्या या पदोन्नतीमुळे घारगावसह संपूर्ण संगमनेर तालुक्याचा शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अवकाळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांसाठी २१ कोटी ३० लाख रुपयांच्या मदतीस मंजुरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे बाधित झालेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी २१ कोटी ३० लाख ३७ हजार ४०० रुपयांच्या अनुदानास शासनाने मंजुरी दिली असून, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सादर केलेल्या अंतिम सुधारित अहवालानुसार जिल्ह्यातील १९९ गावांतील २१ हजार ४९५ शेतकरी या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झाले असून, १२ हजार ३४६.३९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. तालुकानिहाय आकडेवारीनुसार नेवासा तालुक्यात सर्वाधिक १० हजार २९४ शेतकरी व ६ हजार ३३५.७२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्याखालोखाल राहुरी, पारनेर, राहाता व कोपरगाव तालुक्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ही मदत शासनाच्या २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयानुसार ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या पिकांसाठी मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार जिरायत क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर ८ हजार ५०० रुपये, बागायत क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर १७ हजार रुपये व फळबाग क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर २२ हजार ५०० रुपये या दराने अनुदान देण्यात येणार आहे.

चालू हंगामात यापूर्वी वितरित करण्यात आलेल्या मदतीच्या निधीमध्ये या मंजूर निधीचा समावेश नसल्याची खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच एका हंगामात विहित दराने केवळ एकदाच मदत देण्यात येईल, याची दक्षता घेण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले आहेत. लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात वितरित करण्यात येणार असून, कोणत्याही लाभार्थ्यास दुबार मदत मिळणार नाही याची तहसील कार्यालयांनी कटाक्षाने दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

मंजूर निधीचा वापर केवळ मंजूर उद्देशासाठीच करण्यात यावा. निधी खर्च करताना शासन निर्णयातील सर्व सूचना, निकष, अटी व शर्तींचे काटेकोर पालन करावे.

# कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण, अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- राज्य शासनाने थकीत पीक कर्जाच्या ओझ्यातून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ जाहीर केली असून, या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ दिला जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण तसेच एग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणीची प्रक्रिया तत्काळ पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ व गारपीट यांमुळे पीक कर्जाची परतफेड करू न शकलेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांना नव्याने कर्ज उपलब्ध व्हावे, यासाठी २ जून २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या योजनेस मान्यता देण्यात आली. यानुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदतीच्या पीक कर्जांपैकी ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली कर्जे विचारात घेतली जाणार आहेत. पात्र शेतकऱ्यांना कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ दिला जाईल. यापूर्वी महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ चा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्ती देण्यात येईल.

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आहे, त्यांना एकवेळ तडजोड योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यानंतर शासनाच्या योजनेचा लाभ घेता येणार असून, यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. वित्तीय शिस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने विशेष तरतूद केली असून, सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून, शासनामार्फत याबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना लवकरच प्रसिद्ध करण्यात येतील. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण व एग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य राहील.

अनेक पात्र शेतकरी आधार क्रमांक, बँक खात्याची अपूर्ण माहिती किंवा डिजिटल नोंदणीच्या अभावामुळे योजनेच्या लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे सर्व पात्र शेतकरी बांधवांनी आपले आधार क्रमांक, बँक खाते, मोबाईल क्रमांक व जमिनीच्या नोंदी अद्ययावत करून मृत कर्जदार खातेदारांच्या वारसांची नोंद करून घेणे आवश्यक आहे. तसेच, आधार नसल्यास तात्काळ नवीन आधार कार्ड काढून घ्यावे आणि आधार क्रमांकाशी चालू मोबाईल क्रमांक संलग्न (लिंक) करून घ्यावा, जेणेकरून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया सुलभपणे पूर्ण करता येईल.

# शासनाच्या नियमाचे पालन करून ग्राहकांना सेवा, सुविधा द्या - ग्राहक पंचायत



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- अकोले आदिवासी तालुक्यात एसटी बस प्रवासासाठी सध्या महिला, ज्येष्ठ नागरीक आणि 'अमृत' ज्येष्ठ नागरिक यांची नविन कार्ड नोंदणी व कार्ड वितरण प्रक्रिया सुरू असून यामध्ये 'पारदर्शक' पणा आण्यासाठी शासनाने ठरून दिलेले नियम व कंपनीच्या नियमानुसार अकोले तालुक्यात याची व्याप्ती वाढविण्यात बाबतचे निवेदन अकोले तालुक्याचे नायब तहसिलदार किसन लोहरे यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, कार्याध्यक्ष महेश नवले, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की एस टी बसचे नविन सवलत कार्ड काढण्यासाठी दररोज तालुक्यातील नागरीक तासन तास रांगेत सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत उभे राहून ही नंबर लागत नाही मानसिक, अर्थिक, त्रासा सह इत्यादी हाणी होत आहे.

अकोले आदिवासी तालुक्याचे बसस्थानक ते तालुक्यातील बऱ्याच गावाचे अंतर हे ४०/६०/८० किलो मिटर्स असे आहे. एवढ्या मोठ्या तालुक्यात १ एकच सुविधाकेंद्र बस स्थानक येथे चालु असून येथ` दररोज मोठी गर्दी होत आहे. एस टी महामंडळाने प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सवलती अधिक सुसंगत 'पारदर्शक' आणि डिजिटल पध्दतीने देण्यासाठी नविन एनसीएमपी कार्ड, कार्य प्रणाली लागु करण्याचा निर्णय घेतला आहे व चालू आहे.

एसटी महामंडळाने नविन कार्ड काढून देण्याची व वितरणाची जबाबदारी ई-बेक्स या कंपनीला दिली आहे. शासनाने ठरून दिलेल्या व ई-बेक्स कंपनीच्या नियमानुसार पाच किलो मिटर्स अंतरामध्ये एका एजंटाने (एजंशीने) कार्ड काढुन देणे हे बंधनकारक आहे.

अकोले आदिवासी तालक्यात ई-बेक्स कंपनीच्या नियमाचे पालन करून ग्रामीण भागात कोतूळ, समशेरपुर, गणोरे, राजुर, शेंडी (भंडारदरा) मवेशी, कळस, या गावात एसटीचे नविन सवलत कार्ड काढण्यासाठी रोज सेवा उपलब्ध करून देण्यात यावी. आजुन काही एजंट, एजन्सी यांची अकोले तालुक्यात नेमणुक करण्यात यावी व गावागावात कँप घेऊन नविन कार्ड काढण्याची सेवा देण्यात यावी. तसेच नविन कार्ड १९९ रुपये तर या पूर्वीचे स्मार्ट कार्ड असलेल्या प्रवाशांसाठी १४९ रुपये असा दर निश्चित आहे अनेक पर्याय सांगून जास्त आकारणी पैसे घेऊ नये. स्मार्ट कार्ड काढण्याची दर रोजची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत आसावी असे बोर्ड लावण्यात बंधनकारक असावे एसटीचे नविन सवलत कार्ड काढण्यासाठी ४ ते ६ सहा महिन्याची मुदत वाढ देण्यात यावी असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, कार्याध्यक्ष महेश नवले, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, भाऊसाहेब आभाळे, बबनराव तिकांडे, दत्ता ताजणे, रामदास पांडे, नवनाथ आवारी, सखाहारी पांडे, माधवराव तिटमे, प्रा.डॉ. सुनिल शिंदे, गंगाराम धिंदळे अनंत घाणे, सुरेश गबाले, पाडूरंग खाडे, अशोक उघडे, राम रुद्रे, राजेंद्र घायवट, भाऊसाहेब वाकचौरे, पाडूरंग पथवे, कॉम्रेड तुळसिराम कातोरे, मोहन मुंढे, प्रकाश कोरडे, भाऊसाहेब वाळुंज, ज्ञानेश्वर पुंडे, रामदास पवार, रामहारी तिकांडे आदिंच्या सहया आहे.

# प्रेमा तुझा रंग ' लाल 'कसा

दोन दिवसांपूर्वी विवाह निश्चित झाल्यानंतर सिया गोयल या तरुणीने तिचा प्रियकर चेतन चौधरी याच्या मदतीने भावी पती केतन अग्रवाल याला लोहगडावरील एका दरीत ढकलून देत त्याची क्रूर आणि सुनियोजित हत्या केल्याची घटना समोर आली. या प्रकरणाच्या बातम्या टीव्ही आणि वर्तमानपत्रांमधून समोर आल्यानंतर मन सुन्न झाले. मनात एकच प्रश्न निर्माण झाला-या घटनेस जबाबदार कोण? संबंधित मुलगा-मुलगी, त्यांचे पालक की समाज?

एआय फोटो



अग्रवाल समाज हा उच्चशिक्षित, संस्कारक्षम आणि व्हाईट कॉलर समाज म्हणून ओळखला जातो. या समाजात गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे अपवादानेच आढळतात. तरीही एखाद्याचा जीव घेणे हे किती मोठे पाप आहे, ही जाणीव आजच्या नव्या पिढीच्या मनातून का हरवत चालली आहे, याचा गंभीरपणे विचार समाजधुरीणांनी करण्याची गरज आहे. आधुनिक काळात जन्मकुंडलीपेक्षा वैचारिक कुंडली अधिक महत्त्वाची ठरायला हवी. विवाहापूर्वी मुलगा आणि मुलगी यांच्याशी विविध विषयांवर सखोल चर्चा होणे आवश्यक आहे. मात्र, आज अनेक कुटुंबे प्री-वेडिंग, इव्हेंट आणि सोहळ्यांच्या तयारीत अधिक व्यस्त दिसतात. समोरासमोर थोडक्यात भेट झाली, पसंती झाली आणि दोन मिनिटांची औपचारिक चर्चा झाली म्हणजे सर्व काही संपले, असे समजणे चुकीचे आहे.

दोन्ही कुटुंबांनी आपल्या मुला-मुलींचे विचार, अपेक्षा, मानसिकता आणि परस्पर संमती याची खात्री करून घेतली पाहिजे. असे झाल्यास अशा दुर्दैवी घटना टाळण्यास मदत होऊ शकते. सध्या समाजात मुलींची संख्या कमी असल्याने अनेक ठिकाणी लग्नाची घाई केली जाते. मात्र, घाईपेक्षा योग्य निर्णय अधिक महत्त्वाचा असतो.

ही घटना घडल्यानंतर मुलाच्या आई-वडिलांचा आक्रोश आणि त्यांची असह्य वेदना पाहवत नाही. आजच्या टीव्ही मालिका, चित्रपट आणि सोशल मीडियाचा तरुणांच्या विचारांवर परिणाम होत असल्याची चर्चा अनेकदा होते. अर्थात, प्रत्येक गुन्ह्यासाठी मनोरंजन माध्यमांनाच जबाबदार धरता येणार नाही; परंतु योग्य संस्कार, संवाद आणि मूल्यशिक्षण यांचे महत्त्व कमी होता कामा नये.

आज उच्चभ्रू आणि श्रीमंत कुटुंबांमध्येही अशा घटना घडताना दिसत आहेत. हे पाहून मध्यमवर्गीय समाजही चिंताग्रस्त होत आहे. आधुनिकतेच्या नावाखाली संस्कार मागे पडत आहेत का, हा प्रश्न उपस्थित होतो. अनेक पालक अभिमानाने सांगतात की, आम्ही आमच्या मुलांना पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. परंतु स्वातंत्र्यासोबत जबाबदारी, मूल्ये आणि योग्य मार्गदर्शनही तितकेच आवश्यक आहे. आजच्या अनेक तरुणांना उपदेश म्हणजे कंटाळवाणा विषय वाटू लागला आहे. त्याचे दुष्परिणाम समाजाला अशा घटनांच्या रूपाने पाहावे लागत आहेत. ज्याप्रमाणे प्रत्येक समाजात वधू-वर सूचक मंडळ असते, त्याचप्रमाणे विवाह निश्चित झाल्यानंतर दोन्ही बाजूंची माहिती, त्यांची मानसिक तयारी आणि परस्पर समज याची पडताळणी करणारी एखादी सामाजिक व्यवस्था निर्माण करता येईल का, असा प्रश्न मनात निर्माण होतो. ही घटना अत्यंत भयावह आहे. समाजाने या घटनेकडे केवळ एक गुन्हा म्हणून न पाहता, त्यामागील सामाजिक कारणांचाही गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. समाजधुरीणांनी याबाबत जनजागृती करावी, मूल्याधिष्ठित संवाद वाढवावा आणि अशा घटनांचा तीव्र निषेध करावा, हीच अपेक्षा.

**नारायणशेठ अग्रवाल**
**मो. 9822630330**

## संपादकीय...

# एमपीएससीची डिजिटल झेप

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) आगामी सर्व पूर्व परीक्षा संगणकाधारित (सीबीटी) पद्धतीने घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. मुख्य परीक्षा मात्र पूर्वीप्रमाणे लेखी स्वरूपातच होणार आहे. हा निर्णय राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा असून भरती प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याच्या दिशेने टाकलेले हे मोठे पाऊल आहे. या बदलामुळे भरती प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि सुरक्षित होण्याची अपेक्षा आहे. मात्र, या नव्या व्यवस्थेसोबत काही महत्त्वाची आव्हानेही समोर येणार आहेत. आजच्या काळात जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. बँकिंग, रेल्वे, कर्मचारी निवड आयोग विविध प्रवेश परीक्षा आणि अनेक राज्यांच्या भरती परीक्षा आधीपासूनच संगणकाधारित पद्धतीने घेतल्या जात आहेत. त्यामुळे एमपीएससीनेही या बदलाचा स्वीकार करणे ही काळाची गरज होती. दरवर्षी लाखो उमेदवार परीक्षा देत असल्यामुळे पारंपरिक पद्धतीने परीक्षा घेणे, प्रश्नपत्रिका छापणे, त्यांचे वितरण, उत्तरपत्रिकांची तपासणी आणि निकाल जाहीर करणे यासाठी मोठा कालावधी लागतो. सीबीटी पद्धतीमुळे या प्रक्रियेला गती मिळेल आणि निकालही कमी वेळात जाहीर होऊ शकतील. या बदलाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे भरती प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांत विविध भरती परीक्षांमध्ये प्रश्नपत्रिका फुटणे, गैरप्रकार, बनावट उमेदवार आणि कॉपीच्या घटना समोर आल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचा परीक्षेवरील विश्वास कमी झाला. संगणकाधारित परीक्षेमुळे प्रश्नपत्रिकेची गोपनीयता राखणे अधिक सोपे होईल. उत्तरपत्रिकांचे संगणकीय मूल्यमापन होणार असल्याने मानवी चुका कमी होतील आणि निकाल अधिक अचूक व जलद लागतील. मात्र, या निर्णयाची दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. महाराष्ट्रातील अनेक ग्रामीण भागांमध्ये आजही विद्यार्थ्यांना संगणकाचा पुरेसा अनुभव नाही. अनेक उमेदवारांनी कधीही संगणकावर परीक्षा दिलेली नसते. अभ्यास चांगला असूनही संगणक हाताळण्याच्या अनुभवाअभावी त्यांचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो. त्यामुळे शहरातील आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धेची असमानता निर्माण होण्याची शक्यता आहे. ही डिजिटल दरी कमी करणे ही शासन आणि आयोगाची मोठी जबाबदारी असेल. सीबीटी परीक्षा यशस्वी करण्यासाठी राज्यभर आधुनिक परीक्षा केंद्रे उभारणे, अखंडित वीजपुरवठा, उच्चगती इंटरनेट, सक्षम सर्व्हर आणि प्रशिक्षित तांत्रिक कर्मचारी उपलब्ध असणे आवश्यक आहे. परीक्षा सुरू असताना तांत्रिक बिघाड झाल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे तांत्रिक यंत्रणा अत्यंत सक्षम आणि विश्वासार्ह असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना नव्या प्रणालीशी जुळवून घेण्यासाठी आयोगाने मोफत मॉक टेस्ट, ऑनलाइन सराव परीक्षा, संगणक प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. प्रत्येक जिल्ह्यात सराव केंद्रे सुरू करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सीबीटीचा अनुभव दिल्यास त्यांच्या मनातील भीती दूर होईल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. एमपीएससीचा हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. बदलत्या काळानुसार परीक्षा व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा वापर वाढणे आवश्यक आहे. मात्र, हा बदल केवळ तांत्रिक न राहता सर्व विद्यार्थ्यांसाठी समान संधी निर्माण करणारा असावा. भरती प्रक्रिया वेगवान आणि पारदर्शक होण्याबरोबरच प्रत्येक पात्र उमेदवाराला न्याय मिळणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. डिजिटल परीक्षा प्रणालीचे खरे यश तंत्रज्ञानात नसून, ती प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी आणि विश्वास देण्यात आहे.

# राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा जागर आवश्यक - अशोक सब्बन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने लोकराजा आणि तत्त्वज्ञ होते. लोककल्याणाची भूमिका त्यांनी कायम जोपासली आणि त्यानुसार अनेक लोकहितकारी निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी केली. आजच्या काळात राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे स्मरण, जतन आणि प्रसार करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन प्रमुख व्याख्याते अशोक सब्बन यांनी केले.

समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त कार्यालयातील सभागृहात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, विशेष अधिकारी सावित्रा लबडे, सहाय्यक लेखाधिकारी संदीप देठे, रेनाविकार विद्यालयाचे प्राचार्य राजेश भालसिंग, बार्टीचे वरिष्ठ संशोधन अधिकारी दिलावर सय्यद आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रमुख व्याख्याते अशोक सिब्बल म्हणाले, सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून काम करणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांचा इतिहास प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचे स्मरण आणि आचरण आजच्या काळात अधिक आवश्यक आहे. त्यांनी वैचारिक प्रबोधनाचा वारसा समाजाला दिला. सर्वधर्मसमभावाचा संदेश त्यांनी केवळ दिला नाही, तर तो प्रत्यक्ष कृतीतूनही सिद्ध केला.

सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून शिक्षणाचा विस्तार, महिलांच्या सक्षमीकरणासाठी कायदे व धोरणे, आरक्षणाची अंमलबजावणी, सर्व धर्मीयांना समान रोजगाराच्या संधी, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता, सहकारी संस्थांची उभारणी, औद्योगिक विकासाला चालना तसेच क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. समानतेच्या तत्त्वावर सर्वांना संधी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा दृष्टिकोन आजही मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य राजेश भालसिंग म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून दरवर्षी विविध उपक्रमांनी साजरी केली जाते. ते समाजातील दुर्बल व वंचित घटकांचा आधारस्तंभ होते. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत समाजहिताचे आचरण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# अमली पदार्थांपासून दूर राहा, समाजाला व्यसनमुक्त करा : प्रा. डॉ. शिवाजीराव पोखरकर

युवावार्ता (प्रतिनिधी)

माळवाडी (बोटा) - श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माळवाडी (बोटा) येथे २५ जून रोजी 'आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ दुरुपयोग व अवैध तस्करी विरोधी दिनानिमित्त(२६ जून)' जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थीनी कार्तिकी बिडवे व सना शेख यांच्या सूत्रसंचालनाने झाली. प्रास्ताविकानंतर प्रा. आकाश शेळके यांनी अमली पदार्थांच्या व्यसनाचे शारीरिक, मानसिक, सामाजिक व आर्थिक दुष्परिणाम याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पोखरकर यांनी अमली पदार्थांपासून दूर राहा, समाजाला व्यसनमुक्त करा. व्यसनमुक्त युवक हीच सशक्त व प्रगत भारताची खरी ओळख आहे असे प्रतिपादन केले. याच प्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. अमित पोखरकर यांनी अमली पदार्थांचे सेवन, बाळगणे व अवैध तस्करी यासंदर्भातील कायदेशीर तरतुदी, शिक्षा, कारावास व दंड याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थी प्रशांत गिते, साक्षी मांडे, अस्मिता डोंगरे व संजना जाधव यांनी मनोगते व्यक्त केली. विद्यार्थी तृप्ती रकते, साक्षी दिघे, प्रतीक्षा भालेराव व संजना जाधव यांनी जनजागृतीपर पोस्टर्स सादर केले, तर कादंबरी कुरकुटे, सांची गायकवाड, सुमेध भोईर, ओम गुंड, स्वामिनी शेळके, सानिका काकड, प्रेरणा वरपे व साक्षी रुपवते यांनी अमली पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम यावर आधारित नाट्य सादर केले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ घेतली.

यावेळी फार्मसी विभागाचे प्राचार्य डॉ. सागर सांगळे, प्रा. सचिन वाकचौरे, प्रा. मंगल शेळके, प्रा. स्वप्नील वरे, प्रा. स्नेहा फंड, प्रा. माधुरी सुपेकर, प्रा. ज्योत्स्ना शेलार, प्रा. समीक्षा बिबवे, प्रा. साक्षी सांगळे, प्रा. ज्योती दातीर, प्रा. राधिका जाधव तसेच प्रा. मयुरी डुंबरे उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन इव्हेंट मॅनेजमेंट कमिटीच्या मार्गदर्शक प्रा. निशा वरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी अयाज सय्यद, बाळेश्वर काशीद तसेच प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

# देवठाण येथे ज्येष्ठ माता भीमाबाई शेळके यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधानसभा अध्यक्ष तसेच अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान संचालक सुधीर कारभारी शेळके यांच्या मातोश्री भीमाबाई कारभारी शेळके यांचे शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुली, नातवंडे, पतवंडे तसेच मोठा शेळके परिवार असा आप्तपरिवार आहे. त्यांचा अंत्यविधी शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी सकाळी आढळा तिरी, देवठाण (ता. अकोले) येथे शोकाकुल वातावरणात करण्यात आला.

कै. भीमाबाई शेळके यांच्या निधनाने देवठाण परिसरात हळहळ व्यक्त होत असून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व शेळके परिवारास हे दुःख सहन करण्याचे बळ प्रदान करो. अशी प्रार्थना यावेळी उपस्थित नागरीकांनी केली.


**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
RUKAIYYABANO HASAN BAGWAN
NEW NAME AS
RUKAIYYA SAMIR BAGWAN
ADD - BAGWANPURA, SANGAMNER
TAL- SANGAMNER, DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
LAYEBA SAMIR BAGWAN
NEW NAME AS
LAYABA SAMIR BAGWAN
ADD - BAGWANPURA, SANGAMNER
TAL- SANGAMNER, DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
ALAMBHAI IBRAHIM SHAIKH
NEW NAME AS
ALAM IBRAHIM SHAIKH
ADD - VAG WASTI
AT POST- SAKUR
TAL- SANGAMNER, DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SAMIRMAHAMAD ISAK BAGWAN
NEW NAME AS
SAMIR ISAKBHAI BAGWAN
ADD - BAGWANPURA, SANGAMNER
TAL- SANGAMNER, DIST AHMEDNAGAR

**पाहिजेत**
श्रद्धा एजन्सी
ड्रायव्हर - २ जागा
जे. पी. रोड, रंगारगल्ली
संगमनेर, जि. अ.नगर
— संपर्क —
9665557877

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत.
टू व्हिलर आवश्यक
8999795056

**CHANGE IN NAME**
I,Tamboli Fardin Riyaj son of Riyaz Babulal Tamboli, resident of Sonar Galli, Kumbhar Ala, Bajarpeth, Sangamner, Ahmadnagar, Maharashtra-422605, have changed my name from Tamboli Fardin Riyaj to Fardin Riyaz Tamboli and shall hereafter be known as Fardin Riyaz Tamboli for all purposes.
Sd/- Fardin Riyaz Tamboli

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
Bepari Rubinabi Mehmoodmian
NEW NAME IS
Rubina Mukhatar Qureshi
Address:- Madina Nagar Near Gausiya Masjid Galli No 3 Sangamner 422605 Dist - Ahilyanagar

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
YASMIN ISMAIN SHAIKH
NEW NAME AS
YASMIN YUNUS SHAIKH
ADD - BISMI COLONY, KOLHEWADI, ROAD SANGAMNER
TAL- SANGAMNER, DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
MOHAMMED REHAN AHMED QURAISHI
NEW NAME AS
MOHAMMADREHAN AHMAD QURESHI
ADD - KHATIK GALLI, MOGLAPURA, SANGAMNER
TAL- SANGAMNER, DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
PRAFULLA ANIL BHOSALE
NEW NAME AS
PRAFUL ANIL BHOSALE
ADD - SANGAMNER
TAL- SANGAMNER, DIST AHMEDNAGAR

**नावात बदल**
मी संगीता रघुनाथ गीते रा. संगमनेर, माझे लग्नानंतरचे नाव संगीता मनोज बोरसे असे झाले आहे. वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती(प्रतिज्ञापत्र) एकच आहे.
संगीता रघुनाथ गीते
रा. संगमनेर

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**पाहिजेत**
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
कॉम्प्युटर ऑपरेटर (१ जागा)
– पत्ता–
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458






# भाजयुमो उत्तर अहिल्यानगर जिल्हा सचिवपदी श्रीराज थोरात यांची नियुक्ती

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -भारतीय जनता पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम करण्याच्या उद्देशाने भारतीय जनता युवा मोर्चा उत्तर अहिल्यानगर जिल्ह्याची नूतन कार्यकारिणी रोहीत राजेश चौधरी यांनी जाहीर केली असून या कार्यकारिणीत अनेक नव्या चेहऱ्यांना महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. या कार्यकारिणीत सामाजिक, संघटनात्मक आणि जनसंपर्क क्षेत्रात सक्रिय असलेल्या श्रीराज रविंद्र थोरात यांची भारतीय जनता युवा मोर्चा, उत्तर अहिल्यानगर जिल्हा सचिव या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे संगमनेर तालुक्यासह उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्णजी विखे पाटील, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजयदादा विखे पाटील, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश प्रभारी सुनीलजी राणे, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज दादा महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भारतीय जनता पक्षाचे उत्तर अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष नितीनजी दिनकर यांच्या सूचनेनुसार उत्तर अहिल्यानगर भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रोहित राजेश चौधरी यांनी नूतन कार्यकारिणीची घोषणा केली आहे.

जिल्हा सचिवपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर श्रीराज रविंद्र थोरात यांनी पक्षश्रेष्ठी, वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शुभचिंतकांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी सांगितले की, पक्षाने माझ्यावर टाकलेला विश्वास हा माझ्यासाठी मोठा सन्मान असून ही जबाबदारी केवळ पदाची नसून जनसेवा, राष्ट्रसेवा आणि संघटन अधिक प्रभावी करण्याची संधी आहे. हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी पूर्ण निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पणाने कार्य करणार आहे.

ते पुढे म्हणाले की, उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक गावापर्यंत भारतीय जनता युवा मोर्चाची संघटनात्मक ताकद पोहोचविणे, युवकांना पक्षाच्या राष्ट्रवादी विचारधारेशी जोडणे, बेरोजगारी, शिक्षण, कौशल्य विकास, पर्यावरण, रक्तदान, आरोग्य, स्वच्छता आणि विविध सामाजिक विषयांवर युवकांचा सक्रिय सहभाग वाढविणे हे आपले प्रमुख ध्येय राहील. युवकांच्या ऊर्जेला विधायक दिशा देत समाजहित आणि राष्ट्रहिताच्या कार्यात त्यांना सहभागी करून घेण्यासाठी व्यापक जनसंपर्क अभियान राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

श्रीराज रविंद्र थोरात यांनी शेवटी पक्षश्रेष्ठी, वरिष्ठ नेते, सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आपल्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक शुभचिंतकाचे पुन्हा एकदा मनःपूर्वक आभार मानत, भारतीय जनता पार्टीची विचारधारा, विकासाची भूमिका आणि जनहिताची धोरणे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन. असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पोलिओमुक्त महाराष्ट्रासाठी २८ जून रोजी लसीकरण मोहीम

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून पोलिओमुक्त महाराष्ट्राचा दर्जा कायम राखण्यासाठी सर्व पालकांनी रविवार, २८ जून २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले आहे. या मोहिमेसाठी राज्यभरात ८९,४८९ लसीकरण बुथ, २६,५३० ट्रान्झिट पथके, १३,५१८ मोबाईल पथके आणि ५८६ रात्रपाळी पथके कार्यरत राहणार आहेत. देशाला पोलिओमुक्त ठेवण्यासाठी सन १९९५ पासून राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात पोलिओचा शेवटचा रुग्ण सप्टेंबर २०१० मध्ये बीड जिल्ह्यात आढळला होता, तर देशातील शेवटचा रुग्ण जानेवारी २०११ मध्ये पश्चिम बंगालमध्ये नोंदविण्यात आला होता. त्यानंतर २७ मार्च २०१४ रोजी जागतिक आरोग्य संघटनेने भारताला पोलिओमुक्त देश म्हणून घोषित केले. मात्र, शेजारील काही देशांमध्ये अद्यापही पोलिओचे रुग्ण आढळत असल्याने देशात या आजाराचा प्रसार होण्याचा धोका कायम असून सतर्कता बाळगणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात रविवार, २८ जून २०२६ रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील अंदाजे १ कोटी ३ लाख बालकांना सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत पोलिओ प्रतिबंधक बायव्हॅलेंट ओरल पोलिओ व्हॅक्सीन (लजझत) चे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत.

बुथवर येऊ न शकलेल्या बालकांचे शहरी भागात पुढील पाच दिवस आणि ग्रामीण भागात पुढील तीन दिवस आरोग्य कर्मचाऱ्यांकडून गृहभेटीद्वारे लसीकरण करण्यात येईल. तसेच प्रवासात असलेल्या बालकांसाठी ट्रान्झिट, मोबाईल आणि रात्रपाळीच्या विशेष पथकांमार्फतही मोहिमेच्या कालावधीत लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य लसीकरण कृती दलाची बैठक घेण्यात आली असून सर्व संबंधित शासकीय विभाग आणि विविध यंत्रणांना सक्रिय सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. मोहिमेच्या समन्वयासाठी प्रत्येक जिल्हा आणि महानगरपालिकेसाठी राज्यस्तरीय नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले असून जिल्हा, तालुका आणि वॉर्ड स्तरावरही नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य, जिल्हा आणि महानगरपालिका स्तरावर वैद्यकीय अधिकारी तसेच लसीकरण कर्मचाऱ्यांचे टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा व शहर लसीकरण कृती दलाच्या बैठका घेण्यात आल्या असून मोहिमेसाठी आवश्यक निधी, वित्तीय मार्गदर्शक सूचना आणि पोलिओ लसीचा पुरेसा साठाही सर्व जिल्ह्यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.


संगम ग्रामविकास मंडळ (संग्राम) संस्था संचलित,

## डॉ. देवेंद्र ओहारा निवासी मतिमंद विद्यालय

**वेल्हाळे, पो. राजापूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

### जाहीर निविदा सुचना

संग्राम संस्था संचलित, डॉ. देवेंद्र ओहारा निवासी मतिमंद विद्यालय, वेल्हाळे (ता. संगमनेर) येथे खालील प्रस्तावित कामासाठी विहित किमान पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अनुभवी आणि नामांकित कंत्राटदारांकडून सीलबंद फक्त मजुरी (Labour Rate) निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | कामाचे नाव | कामाचे स्वरूप उंची व क्षमता | कामाची मुदत | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | E.S.R (उंचावरील पाण्याची टाकी) बांधकाम करणे | बांधकाम फक्त मजुरी (Labour Rate) उंची: ९ मीटर क्षमता: ५०,००० लिटर | २ महिने | ५०० |

निविदा वेळापत्रक व नियम:

कोरे निविदा फॉर्म मिळण्याचे ठिकाण: डॉ. देवेंद्र ओहारा निवासी मतिमंद विद्यालय, वेल्हाळे, पो. राजापूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांच्या कार्यालयीन वेळेत. कोरे निविदा फॉर्म मिळण्याची अंतिम तारीख: दिनांक ०५ जुलै २०२६ पर्यंत (कार्यालयीन वेळेत). सीलबंद निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख व वेळ: दिनांक ०५ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत. निविदा उघडण्याची तारीख व वेळ: दिनांक ०५ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता संस्था कार्यालयात.

टिप: कोणतेही कारण न देता कोरे निविदा फॉर्म देणे नाकारणे, तसेच आलेली कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतीही कारणे न देता नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा. सचिवांनी स्वतःकडे राखून ठेवलेला आहे.

**स्थळ: वेल्हाळे (संगमनेर)**
**दिनांक: २६/०६/२०२६**

**सेक्रेटरी**


# मंडळ अधिकाऱ्याला कॉलर पकडून जीवे मारण्याची धमकी

युवावार्ता (प्रतिनिधी)

तालुक्यातील पिंपळगाव कोंझीरा-कोकणेवाडी परिसरात रस्त्याच्या वादातून मंडळ अधिकारी धोंडीबा भालचिम यांना धक्काबुक्की करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. बुधवारी सकाळी अकरा वाजेच्या सुमारास ही घटना घेडली याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंडळाधिकारी धोंडीबा - भालचिम हे एका रस्ता प्रकरणाच्या चौकशीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी कोकणेवाडी शिवारात गेले होते. तेथील - वादग्रस्त रस्ता खुला करण्यासाठी आणलेले - जेसीबी मशीन व्यवस्थित चालते की नाही, याची पाहणी ते करत उभे होते. त्याच वेळी पिंपळगाव कोंझीरा येथील रहिवासी किशोर दर्शन वाकचौरे हा तिथे आला आणि त्याने 'येथे रस्ता करायचा नाही, असे म्हणत भालचिम यांना हुज्जत घालण्यास सुरुवात केली.

आरोपी किशोर वाकचौरे एवढ्यावरच थांबला नाही, तर त्याने भालचिम यांना अद्वातद्वा शिवीगाळ करत थेट त्यांच्या शर्टची कॉलर पकडली आणि त्यांना जोरात ढकलून दिले. हा रस्ता तुम्ही कसा करता ते मी पाहून घेतो,' असे म्हणत त्याने जमिनीवरचा दगड उचलला आणि कुऱ्हाडीने तोडून टाकीन, अशी जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारानंतर मंडळ अधिकारी धोंडीबा भालचिम यांनी संगमनेर तालुका पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी किशोर दर्शन वाकचौरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# राजूर ग्रामपंचायत सुरू करणार एकल महिलांच्या साठी स्वतंत्र कक्ष



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- राजूर ग्रामपंचायतीच्या सभागृहात आंतरराष्ट्रीय एकल महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एकल महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांना स्वाभिमानाने जगता यावे यासाठी राजूर ग्रामपंचायत सर्वतोपरी मदत मिळवून देण्यास सदैव कटिबद्ध आहे. या महिलांच्या अडीअडचणी स्थानिक पातळीवरच तातडीने सुटाव्यात, यासाठी गाव पातळीवर एक स्वतंत्र कक्ष सुरू करण्याचा आमचा मानस आहे, असे प्रतिपादन राजूर ग्रामपंचायतीचे प्रभारी सरपंच तथा उपसरपंच संतोष बनसोडे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा जोतिबामहिला.फुले यांच्या प्रतिमांच्या पूजनाने झाली. यावेळी गावातील एकल, विधवा, परित्यक्ता आणि कुटुंबप्रमुख महिला उपस्थित होत्या.

व्यासपीठावर माजी सरपंच गणपतराव देशमुख, ग्रामपंचायत सदस्या विमल भांगरे, सदस्य अतुल पवार, ग्रामसेवक राकेश पाटील उपस्थित होते. मार्गदर्शन करताना ग्रामसेवक राकेश पाटील यांनी एकल महिलांसमोरील सामाजिक, आर्थिक व कायदेशीर प्रश्नांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, 'एकल महिलांना मालमत्तेचा हवक, पेन्शन, आरोग्य आणि मुलांच्या शिक्षणात अनेक अडचणी येतात. यावर मात करण्यासाठी शासनाची संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, मुलींसाठीच्या शिष्यवृत्ती आणि बचत गटांच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

# महाकर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय

शेतकरी राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे. शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

कर्जमुक्ती योजना काय आहे :-

२०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही.

याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**एकवेळ समझोता योजना-**

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात




शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.

प्रोत्साहनपर लाभ :

नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.

तसेच, २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णतः परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा ५ हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा:

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुर्नगठन/फेरपुर्नगठन थकीत हप्त्याची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत रक्कम रु. ५० हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती, आणि रु. ५० हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता (जढड) योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत ३१ मार्च २०२७ असणार आहे.

**योजनेचे निकष :**

- ✻पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.
- ✻१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू.
- ✻३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश.
- ✻३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश.
- ✻ जमीन धारणेची अट नाही.
  पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती.
- ✻२ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ.
- ✻ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.
- ✻ राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जांना लागू.

**कोण पात्र असणार नाहीत :**

विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य. केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु. २५ हजार पेक्षा अधिक आहे.

राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ.) तसेच अनुदानित संस्थांतील रु. २५,००० पेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी. शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे २५ हजार पेक्षा अधिक.

मासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील). कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. २५ हजार पेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी. मात्र, सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील.

या कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शक असून या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**काशीबाई थोरात**
**विभागीय संपर्क अधिकारी, मुंबई**

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जड्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०





भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# गुटखामाफियांवर आता थेट 'मकोका'

## जामीनही होणार कठीण



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यात गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्री करणाऱ्या गुटखामाफियांविरोधात आता थेट महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी यासंदर्भात कठोर भूमिका घेतल्याने गुटखा माफियांचे धाबे दणाणले आहेत.

गुटखा विक्री किंवा वाहतूक करताना पकडलेल्या आरोपींवर थेट मकोका लावला जाणार असल्याने त्यांना सहज जामीन मिळणेही कठीण होणार आहे. या निर्णयामुळे अनेक ठिकाणी गुटख्याची उघड वाहतूक कमी झाली असली तरी परराज्यातून ट्रॅव्हल्स आणि मालवाहू वाहनांद्वारे चोरीछुपे गुटखा जिल्ह्यात दाखल होत असल्याची माहिती समोर आली आहे. जिल्ह्यात गुटखा पुरवठ्याची मोठी साखळी सक्रिय असून वाहनांमधून टपऱ्यांपर्यंत माल पोहोचवला जातो. त्यानंतर ओळखीच्या ग्राहकांना

### कठोर कारवाई करण्याचा इशारा

लपूनछपून गुटखा विकला जात आहे. कारवाईच्या भीतीचा आधार घेत गुटख्याचे दर चार ते पाच पट वाढविल्याचीही चर्चा आहे. राज्यात गुटखाबंदी असतानाही नियम धाब्यावर बसवून मोठ्या प्रमाणात गुटख्याची तस्करी आणि विक्री सुरू आहे. विशेषतः तरुणांमध्ये वाढलेल्या व्यसनामुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे प्रमाण वाढत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. त्यामुळे आता गुटखा रॅकेटचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी मकोकासारखा कठोर कायदा वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात गुटखा विक्रीचे मोठे रॅकेट कार्यरत असून पोलिसांनी गेल्या पाच महिन्यांत ८६ जणांवर कारवाई केली आहे. मात्र, तरीही गुटखामाफिया निर्धास्तपणे अवैध धंदा सुरू ठेवत असल्याने आता कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाईची गरज व्यक्त होत आहे.

# शालेय पोषण आहार चोरणारे दोघे जेरबंद

## १ लाखांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पोलिसांनी पेढेवाडी जिल्हा परिषद शाळा तसेच अंगणवाडी येथील शालेय पोषण आहार चोरी प्रकरणी टोळी पकडून १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तर मारुती रावजी कुलाळ (वय ३१) व काळू चिंधू कुलाळ (वय ३५, दोघे रा. पेढेवाडी, ता. अकोले) यांना अटक केली आहे.

पेढेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीच्या लोखंडी प्रवेशद्वाराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश करुन शालेय पोषण आहार, एचपी कंपनीची गॅस टाकी तसेच भारत कंपनीच्या दोन टाक्या असे एकूण तीन गॅस टाक्या, शेगडी, तांदूळ १५० किलो, मुगदाळ, गहू भरडा, साखर, तेल, वटाणा, मसाले, मसुरदाळ असा मुद्देमाल चोरुन नेला होता. याबाबत अकोले पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा पोलीस निरीक्षक एस. आर. कोळी यांच्या नेतृत्वाखाली तपास करताना पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की सदर गुन्हा हा मारुती रावजी कुलाळ व काळू चिंधू कुलाळ यांनी केला आहे. दोघांना ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून तीन गॅस टाक्या,

शेगडी, तांदूळ, कडधान्य, मोटारसायकल असा एकूण १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस उपनिरीक्षक विनोद खांडबहाले, पोहेकॉ. खाडे, पोकॉ. मनोहर मोरे, काळे, भालेराव यांच्या पथकाने केली आहे.

# अवैध गर्भलिंग निदान रॅकेटचा विस्तार

## आणखी एका डॉक्टराला अटक



युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - अवैध गर्भलिंग निदान चाचण्या आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणातील तपास दिवसेंदिवस अधिक व्यापक होत असून पोलिसांनी या रॅकेटमधील आणखी एका डॉक्टराला अटक केली आहे. डॉ. ज्ञानेश्वर नायकोडी (वय ५४), बीएएमएस, रा. शिरूर, जि. पुणे यांना या प्रकरणात अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना आठ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांच्या तपासात अनेक डॉक्टर, मेडिकल चालक आणि एजंट यांचा या गैरप्रकारात सक्रिय सहभाग असल्याचे समोर आले आहे. विविध जिल्हे आणि तालुक्यांमध्ये एजंटचे जाळे कार्यरत असल्याचे तांत्रिक तपासातून निष्पन्न झाले असून या रॅकेटची व्याप्ती सातत्याने वाढत आहे.

डॉ. नायकोडी यांच्याकडे गर्भवती महिलांना नेमके कोण पाठवत होते, त्यामागे कोणते एजंट कार्यरत होते तसेच आतापर्यंत किती महिलांच्या अवैध गर्भलिंग निदान चाचण्या आणि गर्भपात करण्यात आले, याचा सखोल तपास पोलीस करणार आहेत.

या प्रकरणात आतापर्यंत २४ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये ८ डॉक्टर, ३ मेडिकल चालक आणि वैद्यकीय साहित्य पुरवणारा एक मोठा पुरवठादार यांचा समावेश आहे. दरम्यान, तपासादरम्यान अवैध गर्भलिंग निदानासाठी वापरली जाणारी ६ सोनोग्राफी मशिन, ४ चारचाकी वाहने आणि १ दुचाकी विविध ठिकाणांहून जप्त करण्यात आली आहे.

या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली डीवायएसपी भारती आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक आठरे करीत आहेत. या रॅकेटमागील संपूर्ण साखळी उघड करण्यासाठी पोलिसांचा तपास वेगाने सुरू आहे.

UTI SWATANTRA®
India Invest Karo™
uti® UTI Mutual Fund
Haq, ek behtar zindagi ka.
NOTICE OF INVESTOR AWARENESS PROGRAM (IAP)
UTI Mutual Fund invites you for an Investor Awareness Program to be conducted on Jun 29, 2026 at 6.00 pm at Hotel pathik K-G ROAD, SH44, taluka Akole, dist ahilyanagar, Maharashtra 422601 We request your warm presence. Admission open for all.
Ahilyanagar
Jun 28, 2026 Toll Free No.: 1800 266 1230 www.utimf.com
REGISTERED OFFICE: UTI Tower, 'Gn' Block, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400051. Phone: 022 – 66786666. UTI Asset Management Company Ltd. (Investment Manager for UTI Mutual Fund) E-mail: invest@uti.co.in, (CIN-L65991MH2002PLC137867).
An Investor education & awareness initiative of UTI Mutual Fund. To know about the KYC documentary requirements and procedure for change of address, phone number, bank details, etc. please visit https://www.utimf.com/servicerequest/kyc. Please deal with only registered Mutual funds, details of which can be verified on the SEBI website under "Intermediaries/market Infrastructure Institutions". All complaints regarding UTI Mutual Fund can be directed towards service@uti.co.in and/or visit https://scores.sebi.gov.in (SEBI SCORES portal) or to escalate investor may visit https://smartodr.in/login Online Dispute Resolution Portal (ODR Portal) .
Mutual Fund Investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165


सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी
अंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येणारे आजार
- हृदयरोग (Heart Diseases)
- मेंदूरोग (Brain Diseases)
- कर्करोग शस्त्रक्रिया
- अपघात (Accident)
- लहान बालकांची शस्त्रक्रिया
- गुडघ्याचे प्रत्यारोपण
- विद्युत अपघात रुग्ण
- कर्करोग (केमोथेरपी रेडिएशन)
- डायलिसिस
- अपघात शस्त्रक्रिया
- खुबा प्रत्यारोपण
- मेंदूत रक्तस्त्राव होणे / मेंदूत रक्त गोठणे.
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर




अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या

स्त्रियांच्या समस्या
- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य

डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग • अतिदक्षता विभाग • अपघात विभाग
- डायलिसीस विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • न्यूरोविभाग
- हृदयरोग विभाग • मेडिसीन विभाग • अद्ययावत कॅथलॅब
- जॉईंट रिप्लेसमेंट • स्पाईन सर्जरी • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25